## L. A. BILL No. LX OF 2023.

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA ELECTRICITY DUTY ACT, 2016.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६०.

### महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

२०१६ चा महा. २६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौ-याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विद्युत शुल्क (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (२) मध्ये, खंड (सात) मधील, " मेट्रो रेल्वे व मोनोरेल वगळता " हा मजकूर वगळण्यात येईल.

२०१६ चा महा. २६.

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ यामध्ये नवीन कलम १५क समाविष्ट करणे.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः—

शंका निरसन.

"**१५क.** शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, जी वीज,—

(क) भारत सरकारद्वारे वापरली जाते किंवा त्या सरकारच्या वापराकरिता भारत सरकारला विकली जाते, किंवा

(ख) भारत सरकारच्या कोणत्याही रेल्वेचे, मेट्रो रेलचे किंवा मोनो रेलचे बांधकाम, देखभाल किंवा कार्यान्वयन करताना वापरली जाते अथवा कोणत्याही रेल्वेचे, मेट्रो रेलचे किंवा मोनो रेलचे बांधकाम, देखभाल किंवा कार्यान्वयन करताना वापरण्यासाठी विकली जाते,

अशा विजेच्या (मग तिचे उत्पादन शासनाने किंवा इतर व्यक्तीने केलेले असो) वापरावर किंवा विक्रीवर कर लादण्यात येणार नाही किंवा कर लादण्यास प्राधिकृत करण्यात येणार नाही.".

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या **अनुसूची क** ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या **अनुसूची क** मधील, "भाग छ-मोनो व मेट्रो रेल्वे" याच्याशी संबंधित असणारी अनुक्रमांक ७ येथील नोंद वगळण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील विद्युत ऊर्जेच्या वापरावर शुल्क आकारण्याची तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ (२०१६ चा महा. २६) अधिनियमित करण्यात आला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये काढलेल्या शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक इएलडी २०१६/प्र.क्र.२५२/ ऊर्जा-१, दिनांक २१ ऑक्टोबर, २०१६ नुसार, मेट्रो रेलसाठी विद्युत शुल्काचा दर, तिने वापरलेल्या विद्युत ऊर्जेच्या वापराच्या आकारांच्या वीस टक्के इतका आहे.

**२.** मेट्रो रेलचे कार्यान्वयन हे, ऊर्जेचा अत्यधिक वापर करण्याच्या स्वरूपाचे आहे. म्हणून, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, अशा कार्यान्वयनावरील विद्युत ऊर्जेच्या वापरावरील विद्युत शुल्क व वापर आकार यावर प्रचंड खर्च करते. दिल्ली मेट्रो रेलच्या बाबतीत केलेल्या विद्युत शुल्क माफीच्या धर्तीवर, असे विद्युत शुल्क माफ करण्याची विनंती, उक्त महामंडळाने शासनाला केली आहे. मेट्रो रेलचे विद्युत शुल्क माफ केल्यास, जनतेला, कमी केलेल्या प्रवास खर्चात मेट्रो रेल सेवा पुरविता येऊ शकेल. प्रवास खर्च कमी केल्यामुळे, सार्वजनिक वाहतुकीचे साधन म्हणून मोठ्या संख्येतील लोकांना मेट्रो रेलचा वापर करण्यास प्रोत्साहन मिळेल.

तसेच, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २८७ च्या तरतुदीनुसार, कोणतीही रेल्वे बांधणे, तिची देखभाल करणे किंवा तिचा वापर करणे किंवा ती चालविणे यांकरिता विजेच्या वापरावर किंवा विक्रीवर कोणताही कर बसविला जाऊ शकत नाही.

**३.** वरील वस्तुस्थिती विचारात घेता, मेट्रो रेलसाठी तसेच मोनो रेलसाठी उक्त अधिनियमांन्वये विद्युत शुल्क माफ करण्याकरिता, महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ मध्ये यथोचित सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर, **देवेंद्र फडणवीस,**

दिनांक १५ डिसेंबर, २०२३. उप मुख्यमंत्री.

## वित्तीय ज्ञापन

या विधेयकात, महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ (२०१६ चा महा. २६) यात सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, ज्यामुळे राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव होईल अशी कोणतीही तरतूद नाही.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ यांच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र विद्युत शुल्क (सुधारणा) विधेयक, २०२३ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

## सन २०२३ चे वि.स. विधेयक क्रमांक ६०-महाराष्ट्र विद्युत शुल्क (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट

## (महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ यातील उतारे)

## (सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -२६)

**१.** ते **२.** ** ** **

वापरलेल्या ऊर्जेच्या युनिटांवरील शुल्क.

**३.** (१) ** ** **

(२) पुढील घटकांसंबंधातील, वापर आकारांवर किंवा त्यांच्याकडून म्हणजे–

(एक) ते (सहा) ** ** **

(सात) एखाद्या व्यक्तीकडून, मेट्रो रेल्वे व मोनोरेल वगळता वाहनांच्या किंवा जहाजांच्या वापराकरिता तिचा पुरवठा करण्याच्या प्रयोजनासाठी ऊर्जेची निर्मिती करण्यात येत असेल त्याबाबतीत ;

(आठ) ** ** **

(३) ** ** **

**४.** ते **१७.** ** ** **

### अनुसूची क

### वापर आकारावरील विद्युत शुल्क

(कलमे ३ आणि ६ पहा)

| अनु-क्रमांक | वीज देयकाचे प्रशुल्क प्रवर्ग | विविध प्रवर्गाच्या ग्राहकांना पुरविलेल्या विद्युत वापराबाबतचे प्रयोजन | दर |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ ते ६ | ** | ** | ** |
| ७ | भाग छ-मोनो व मेट्रो रेल्वे | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या प्रशुल्क अनुसूचीनुसार. | राज्य शासन, एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा वापर आकाराच्या वीस टक्क्यांपेक्षा जास्त नसेल अशा दराने किंवा दरांनी. |

**अनुसूची (ख)** ** ** **

**अनुसूची (ग)** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६०]**

**[महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.